# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.


:: प्रधान कार्यालय ::

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९


# मच्छिमार ग्राहकांकरीता (पशुसंवर्धन व मत्स्य पालन करणेकरीता) किसान क्रेडिट कार्ड (KCC) कर्ज धोरण

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

**दिनांक १५/०९/२०२३ पर्यंत अद्यावत बदलासह.**
**मा.संचालक मंडळ सभा दि.१५/०९/२०२३ ठराव क्र.१९ अन्वये मंजूर.**

## पशुसंवर्धन व मत्स्य पालन करणेकरीता बँकेच्या मच्छिमार ग्राहकाकरीता केंद्र शासनाच्या किसान क्रेडिट कार्ड (KCC) योजनेअंतर्गत कॅश क्रेडिट कर्ज धोरण खालीलप्रमाणे.

बँकेच्या मच्छिमार ग्राहकाकरीता किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत खेळते भांडवलासाठी कॅश क्रेडिट कर्ज उपलब्ध करण्यात येईल.

**अर्जदारासाठी पात्रता निकष :-**

१. मा.आयुक्त/ उपआयुक्त/सहाय्यक उपआयुक्त, मुंबई शहर व उपनगरे (पूर्व /पश्चिम ) मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे नोंदणी केलेला असावा व त्याबाबतचे त्या कार्यालयाकडून मूळ शिफारस पत्र सादर करणे बंधनकारक राहील.
२. कर्ज मागणी करणाऱ्या मच्छिमार ग्राहकांचे बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कायम वास्तव्य असले पाहिजे.
३. कर्ज मागणी करणाऱ्या मच्छिमार ग्राहकाने इतर बँकांमधून KCC अंतर्गत कोणतेही कर्ज घेतले नसल्याचे पत्र सादर करावे.
४. मच्छिमार ग्राहकांना मुंबै बँकेमध्ये बचत खाते उघडणे आवश्यक राहील.
५. मच्छिमार ग्राहकास बँकेचे नाममात्र सभासदत्व घेण्यासाठी बँकेच्या विहीत नमुन्यातील अर्ज व नाममात्र सभासद फी ची रक्कम शाखेत भरणा करावी लागेल.

**अर्जदाराची कागदपत्रे :-**

१. कर्ज मागणी अर्ज
२. नाममात्र सभासदत्व फॉर्म
३. आधारकार्ड, पॅनकार्ड व लाईट बील (वास्तव्याचे ठिकाणाचे)
४. पासपोर्ट आकाराचा फोटो.
५. मा. तहसिलदार यांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला.
६. व्यवसायाचा व जागेचा पुरावा. (आवश्यकतेनुसार)
७. मा. आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे शिफारस पत्र.

**कर्जाची कमाल मर्यादा :-**

रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक विचारात घेऊन तसेच जिल्हास्तरीय तांत्रिक समितीने (DLTC) निश्चित केलेली कर्ज मर्यादा व कर्जदर लागू राहतील.

प्रत्येक सभासदास KCC अंतर्गत रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २६/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार नियमित व्याज परतावा प्राप्त करणेसाठी जास्तीत जास्त रु.२.०० लाख कर्ज मर्यादेचा वापर करणे आवश्यक असल्याने रु.२.०० लाखाची मर्यादा दिली जाईल. सदर मर्यादा एक वर्षाकरीता असेल. एक वर्षानंतर सदर खाते निरंक करुन घेतले जाईल. ( कर्जदाराच्या मागणीनुसार नुतनीकरणाची सोय लागू असेल.) KCC अंतर्गत सर्व प्रकारच्या कर्जाची एकूण मर्यादा रू.३.०० लाख इतकी राहील.

तथापि, एका अर्जदारास सर्वप्रकारच्या कर्जाची एकूण मर्यादा रु.३.०० लाख इतकी राहील.

**कर्जाचा व्याजदर :-**

रिझर्व्ह बँकेचे दिनांक २६/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. ७% राहील. सदर परिपत्रकानुसार व्याजाचा परतावा केंद्र शासनाकडून DBT अंतर्गत लाभार्थीच्या बचत खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे.

१) कर्जदारास नियमित व्याज परतावा द.सा.द.शे. २% प्रमाणे देण्यात येणार असून त्यासाठी कर्जदाराने जास्तीतजास्त रु.२.०० लाख कॅश क्रेडिट कर्ज मर्यादेचा वापर करणे आवश्यक आहे.

२) विहीत वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या कर्जदारास द.सा.द.शे.३% प्रमाणे अतिरिक्त व्याज परतावा मिळणार आहे. त्यासाठी कर्जदाराने जास्तीतजास्त रु.२.०० लाख कॅश क्रेडिट कर्ज मर्यादेचा वापर करणे आवश्यक आहे.

**कर्ज परतफेडीचा कालावधी :-**

१ वर्षासाठी (कर्जदाराच्या मागणीनुसार नुतनीकरणाची सोय लागू असेल.) किसान क्रेडिट कार्डची वैधता ३ वर्षापर्यंत राहील.

**कोलॅटरल सिक्युरिटी –**

कर्जदारास कर्ज मंजूर रक्कमेच्या १००% कोलॅटरल सिक्युरिटी देणे आवश्यक राहील कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून अर्जदारास स्वतःच्या नावाची मुंबई बँकेतील मुदत ठेव (कर्ज कालावधीपर्यंत वैद्य असलेली) तसेच सोने, एन एस सी, किसान विकास पत्र, एल.आय.सी.विमा पॉलीसी सरेंन्डर व्हॅल्यु, (बँकेच्या नावे असाईन करुन) इत्यादी प्रकारातील कोणतीही सिक्युरिटी तारण म्हणून द्यावी लागेल.

**कर्ज उचल :-**

प्रत्येक सभासदास KCC अंतर्गत रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २६/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार नियमित व्याज परतावा प्राप्त करणेसाठी जास्तीत जास्त रु.२.०० लाख कर्ज मर्यादेचा वापर करणे आवश्यक असल्याने रु.२.०० लाखाची मर्यादा दिली जाईल. सदर मर्यादा एक वर्षाकरीता असेल. एक वर्षानंतर सदर खाते निरंक करुन घेतले जाईल. ( कर्जदाराच्या मागणीनुसार नुतनीकरणाची सोय लागू असेल.) KCC अंतर्गत सर्व प्रकारच्या कर्जाची एकूण मर्यादा रू.३.०० लाख इतकी राहील.

**कर्ज उचलीची कागदपत्रे :-**

१. कर्ज करारनामा.
२. वचन चिठ्ठी
३. अंडरटेकींग
४. डेबिट ॲथॉरिटी लेटर, अटी मान्य असल्याचे पत्र.

**कर्ज मंजूरीच्या अटी व शर्ती :-**

१. कर्जदारास बँकेचे नाममात्र सभासदत्व घेणे बंधनकारक राहील.
२. सदरचे कर्ज एक वर्ष कालावधीचे अल्पमुदती स्वरुपाचे राहील. कर्जदाराचे मागणीनुसार नुतनीकरण करता येईल.
३. कर्जदारास कर्जाचे नुतनीकरण करणेपूर्वी व्याजाचा पूर्णपणे भरणा करणे आवश्यक राहील.
४. सदर कर्जाच्या व्याजदरामध्ये होणारा बदल कर्जदारावर बंधनकारक राहील.
५. कर्ज सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक विमा पॉलिसी कोणत्याही विमा कंपनीकडून घेवून बँकेस सादर करावी लागेल.

६. कर्जदारास डेबिट / क्रेडिट कार्ड वापरा संबंधीचे रिझर्व्ह बँकेचे नियम लागू राहतील.

७. कर्ज खात्यावर मासिक आकारणी झालेले व्याज पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भरणा करणे आवश्यक आहे. थकीत व्याज रक्कमेवर द.सा.द.शे. २% प्रमाणे जादा दंड व्याज आकारण्यात येईल.

८. कर्जदाराने कर्ज खात्याच्या अंतिम मुदतीपूर्वी संपूर्ण कर्जाची व्याजासह परतफेड न केल्यास प्रचलित दरापेक्षा द.सा.द.शे. २% जादा दंडव्याज आकारण्यात येईल.

९. बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय कर्जदारास अन्य कोणत्याही बँकेकडून व अन्य कर्ज देणा–या संस्थेकडून कर्ज घेता येणार नाही.

१०. कर्जदारास मिळणारा व्याज परतावा केंद्र / राज्य शासनामार्फत मिळणार असल्यामुळे शासनाचे नियम लागू राहतील.

११. कोणत्याही अटीत पूर्व सूचनेशिवाय बदल करण्याचा व अटी रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

**कर्ज मंजूरीचे व उचलीचे अधिकार :–**

| अ. क्र. | कर्ज प्रकार | मंजूरीचे अधिकार | प्रत्यक्षात उचल |
|---|---|---|---|
| १ | मच्छिमार ग्राहकासाठी केंद्र शासनाच्या किसान क्रेडिट कार्ड (KCC) योजनेअंतर्गत कॅश क्रेडिट कर्ज | शाखा व्यवस्थापक यांना देण्यात येत आहे. | शाखास्तरावर कर्ज उचल देण्यात यावी. |

**१) शाखास्तरावरील कार्यवाही :–**

वरील कर्ज धोरणानुसार शाखेस प्राप्त होणा–या प्रस्तांवाची संपूर्ण कार्यवाही शाखास्तरावरच करावी. कर्ज धोरणाप्रमाणे प्रस्ताव शाखेस प्राप्त झालेनंतर शाखा व्यवस्थापक यांनी प्रस्तावासोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेबाबत खात्री करुन तपासणीसाठी स्वत: किंवा शाखेतील / विस्तार कक्षामधील अधिकाऱ्यांना देण्यात यावा. त्यांनी प्रथम सिबील रिपोर्ट काढावा व स्कोर योग्य असेल तर निवासी व व्यावसायिक ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देवून कर्ज धोरणाप्रमाणे तपासणी करुन मंजूर / नामंजूरीच्या स्पष्ट कारणासह छाननी अहवाल शाखा व्यवस्थापक यांना विहीत वेळेत सादर करावा. तद्नंतर शाखा व्यवस्थापक यांनी कर्ज मंजूर / नामंजूर करावे व सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

तसेच रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २६/८/२०१९ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सभासदांना द्यावयाचा व्याज परतावाबाबत रिझर्व्ह बँकेस व केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग यांना विहीत वेळेत माहिती सादर करण्यासाठी शाखास्तरावरील कर्ज मंजूरीची माहिती केंद्र कार्यालयास पाठवावी.